IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 5.731
Volume 2, Issue 7, January 2022

# गो ग आगरकर यांचे स्त्री उद्धाराचे कार्य...........

सहा. प्रा. सौ. स्वाती नवनाथ पवार
M. A. B.Ed (मराठी विभाग)
एम. एम.जगताप महाविद्यालय, महाड-रायगड.

**सारांश....**

गोपाळ गणेश आगरकर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील एक बुद्धिनिष्ठ विचारवंत होते. त्यांनी समाज सुधारण्यासाठी अत्यंत तळमळीने प्रयत्न केले. आगरकरांना समाजातला एककल्लीपणा असह्य होत होता. त्यामुळे समाजाची किती आणि कसे नुकसान होते आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती कारण त्यांचा इंग्रजांना जरी विरोध होता तरी इंग्रजी समाजाची सुस्थिती त्यांच्या समाजाचे पुढारलेपण हे त्यांनी जवळून पाहिले होते. त्यामुळे आपल्या भारतीय समाजाचे मागासलेपण त्यांना जास्त बोचत होते. स्त्रियांना अशिक्षित ठेवण्यामुळे समाजात आपल्याच भारतीयांना अस्पृश्य म्हणून बाजूला लोटण्यामुळे समाज स्वतःचेच किती नुकसान करून घेतो आहे याची जाणीव त्यांना सतत होती आणि हेच समाजचित्र बदलण्याचा ध्यास त्यांनी घेतला.

**प्रस्तावना....**

आगरकरांचा काळ सामाजिक दृष्ट्या विचार करतात अत्यंत मागासलेला काळ होता. पण आगरकरांसारख्या विचारवंतांनी समाज सुधारकांनी आपल्या लेखणीचा उपयोग करून विविध शैक्षणिक संस्थांची स्थापना करून नव्या जगाचे ज्ञान समाजापर्यंत पोहोचवून समाजाची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न चालवला होता परंतु त्यांना म्हणावा तसा होकारात्मक प्रतिसाद मिळत नव्हता उलट विरोध दर्शवणाराच होता .या सर्वांमुळे आगरकरांना खूप क्लेश सहन करावे लागले पण तरीही त्यामुळे खचून न जाता अगदी अखेरपर्यंत आगरकरांनी समाज सुधारण्याचे प्रयत्न करतच राहिले.

**स्त्री उद्धाराचे कार्य...**

परतंत्र्याच्या काळात हिंदू समाज किंवा भारतीय समाज फारसा विचार करणारा नव्हता .त्यामुळे जुन्या आचार विचारांनाच चिकटून राहणार होता या सगळ्याचे परिणाम सर्वात जास्त जर कोणाला भोगावे लागत असतील तर ते स्त्रियांना. स्त्रियांची त्यावेळी ची परिस्थिती अक्षरशा 'मुकी बिचारी कोणीही हाका' अशीच होती. खरे तर समाज सुधारण्याचे एक चाक म्हणजे स्त्री .परंतु या स्त्रीची अवस्था तर अत्यंत बिकट दयनीय होती .तिला माणूस म्हणून न वागवता तिच्याकडे केवळ एक उपभोग्य वस्तू म्हणूनच बघितले जात असे. तिला शिक्षणाचा तर गंधही नाही आणि अगदी बाल्यावस्थेतच तिचे लग्न करून द्यायची असूरी प्रथा पडलेली होती.

विधवा स्त्रीवर समाजाकडून जो अन्याय होतो तो वर्णन करताना ते म्हणतात 'बायकोस देवाज्ञा झाल्यामुळे नित्य भगवी वस्त्रे परिधान करणारे शौराच्या दिवशी डोक्यावर किंवा तोंडाच्या कोणत्याही भागांवरील केसांची काडी मात्र दया माया न ठेवणारे पान तंबाखूची किंवा चिलीम विडीची त्या अत्यंत खेदजनक दिवसापासून आमरण समिध शेकणारे व मंगलकार्यात किंवा कामासाठी घरातून बाहेर पडणाऱ्या इसमापुढे येण्यास मिळणारे नवरे कोणी पाहिले आहेत का? जर नसतील तर स्त्रियांची अशा तऱ्हेची वागणूक सतीत्वाची साध्वित्वाची पतिव्रतात्वाची साक्ष

देणारी कशी होते हे कोणी उघड करून सांगेल काय? या अवतरणातील उपरोध आगरकरांच्या पोट तिडकीतून आलेला दिसतो. कारण जे प्रश्न त्यांनी पुरुषांना विचारले आहेत त्या प्रकारचे अत्यंत हलाखीचे आयुष्य विधवाना जगायला लावायची त्याकाळी समाजाची रीतच होती .स्त्रीची दयनीय अवस्था नाहीशी होण्यासाठी तिने सुशिक्षित होण्याची गरज असल्याचे आगरकर परत परत सांगतात .

स्त्री-पुरुषातील विवाह वेळेचे वयातील अंतर स्त्रियांच्या सामाजिक मानसिक गुलामगिरी यांसारख्या गोष्टी नष्ट होण्यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यामुळे देशाची उन्नती नीट होऊ शकत नाही असे ते वारंवार सांगतात. अक्षरशः कंठ कोश करतात आपल्या देशाच्या समाजाच्या उन्नतीसाठी ज्यांना जीवनाचे गमक समजले आहे अशाने प्रयत्न करावेत. समाजाच्या व देशाच्या अस्तित्वाविषयीचे विदारक सांगताना ते म्हणतात की स्त्री-पुरुषांच्या लग्नाच्या वेळेचे वयातील अंतर कमी करायला हवे देशासाठी तेच योग्य आहे. नाहीतर देशाचा नाश व्हायला वेळ लागणार नाही. यासाठी ते सुशिक्षित देश बांधवांना आवाहन करतात की युनायटेड स्टेट ,फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड वगैरे देशांचा आदर्श डोळयासमोर ठेवत स्त्री-पुरुषांमध्ये समानतेचे संबंध कसे असावे ते ठरवून त्याप्रमाणे त्यांच्या वर्तनात बदल घडून आणणे आवश्यक आहे. आणि त्यामुळेच भावी पिढ्यांची स्थिती चांगली राहू शकेल असा इशाराही ते देतात .यावर हेच जाणवते की आपल्या देशातील स्त्रियांची दयनीय अवस्था बालविवाह, केशवपन यांसारख्या दुष्पप्रथा देशाला कोणीकडे नेतील हा प्रश्न आगरकरांना सतत भेडसावतो. आणि काही प्रथा जुन्या पिढीचा विरोध पत्करून ही बदलल्या पाहिजेत असे ते सांगतात. जसे पुनर्विवाह किंवा पाळी येण्यापूर्वी तिचा विवाह करणे या प्रथा स्त्रियांच्या मानसिक गुलामगिरी दर्शवणाऱ्या असून त्यातून स्त्रीची सुटका करायला हवी असे त्यांना वाटते यावरून स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करण्याला अत्यंत नाही हा त्यांचा दृष्टिकोन प्रकटतो.

**स्त्री शिक्षण.....**

आगरकरांनी स्त्रीच्या सुखी आयुष्याविषयी आपल्या निबंधातून बराच उगपोह केलेला दिसतो. ते असे खात्रीपूर्वक सांगतात की, ज्या देशाची कुटुंब स्थिती अतिशय उत्तम असेल तोच देश ,तेच राष्ट्र राजकीय, धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात प्रगती करू शकेल .पण त्यासाठी समाजाची जी दोन चाके स्त्री आणि पुरुष यातली स्त्री ही समर्थ बलवान आणि शिक्षित असायला हवी. मुलीचे लग्न हा आगरकरांच्या काळात सामाजिक आणि धार्मिक दृष्ट्या महत्त्वाचा विषय होता. मुलीचे मासिक पाळी पूर्वी लग्न झालेच पाहिजे. आणि नंतर स्त्रीचे वय तिच्या शरीराची अपरिपक्वता लक्षात न घेता लगेच गर्भधारणा झालीच पाहिजे .अशा राक्षसी प्रथांमुळे मुलींना शिक्षण घेता येत नसे त्यांच्या आयुष्याला योग्य ती दिशा मिळत नसे. त्यामुळे या प्रथा बंद करून मुलींच्या आयुष्याचा विचार करणे आवश्यक आहे असे आगरकर परोपरिने सांगतात. म्हणून मुलींच्या शिक्षणाला महत्त्व देऊन तिला सुशिक्षित सुसंस्कारित करून मगच तिचे लग्न करावे असे त्यांचे मत होते. मुलींना शिक्षण दिल्याने मुली कमावतील आणि पुरुषांना घरातील बायकांची कामे करायला लागतील की काय अशी भीतीही समाजात होती पण ही कामे फक्त स्त्रियांनीच केली पाहिजेत असे नाही हेही आगरकर आवर्जून सांगतात. ज्यावेळी स्त्रीवर वैधव्यासारखा कठीण प्रसंग कोसळतो त्यावेळी तिच्याकडे चरितार्थ चालवण्यासाठी म्हणजेच रोजच्या गरजा भागवण्यासाठी आवश्यक ते शिक्षण नसल्याने तिला कुटुंबातील इतर पुरुषांवरच अवलंबून राहावे लागते. किंवा आपल्या नवऱ्याबरोबर मरण तरी पतकरावे लागते. ही प्रथम उच्च जातीतूनच दिसते याला कारण म्हणजे स्त्रियांना स्वतःचे आणि स्वतःच्या मुलांचे संगोपन करण्याइतके शिक्षण नसते त्यामुळे आगरकरांनी असे सुचवले आहे की मुलींनाही लिहिणे ,वाचणे शिकून एखाद्या धंद्याचे ज्ञान द्यायला हवे. जेणेकरून ती स्वतःचा चरितार्थ चालू शकेल यासाठी मुली व मुलगी

यांच्यावर प्राथमिक शिक्षणाची सक्ती सरकारने करावी असे आगरकर सांगतात. अतिशय प्रामाणिकपणे मुलांचे संगोपन करणारे स्त्री निरक्षर नसावी याबाबत कायदा करण्याची अपेक्षा ते सयाजीराव गायकवाड यांच्याकडून करतात .मुला मुलींचे शिक्षण एकत्र झाल्याने समाजावर त्यांचे दुष्परिणाम न होता त्याचे चांगलेच परिणाम होतील असे त्यांना वाटते. याचाच अर्थ असा की स्त्रियांना शिक्षण दिलेच पाहिजे मुली व मुले असा भेद न करता मुलींनाही हवे ते व हवे तेवढे शिक्षण घेता यायला हवे मुले व मुली यांना एकत्र शिक्षण द्यायला हवे असे त्यांचे मत होते.

**निष्कर्ष.....**

आगरकालीन हिंदू समाज वैचारिक दृष्ट्या मागासलेल्या होता. त्याचा परिणाम समाजातल्या खालच्या थरातल्या लोकांबरोबर स्त्रियानाही भोगावा लागतो. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता त्यांचे लग्न अगदी लहान वयात लावून दिले जायचे वैधव्य आले तरी त्यांना पुनर्विवाहाची परवानगी नव्हती ही शिक्षणाविषयीची, लग्नाच्या वयाविषयीची बंधने तर तिच्यावर होतीच शिवाय विशिष्ट प्रकारचा पोशाख तिने केला पाहिजे असे बंधनही तिच्यावर होते. या सर्व बंधनामध्ये तिच्या व्यक्तिमत्त्वाची वाढ पूर्णपणे खुंटली जाऊन तिची घुसमट होणे अपरिहार्य होते. स्त्रियांच्या या प्रश्नाला आगरकरांनी वाचा फोडली आणि स्त्रियांना कोणत्याच बाबतीत स्वातंत्र्य कसे नाही ते मिळणे किती आवश्यक आहे. यामुळे समाजाचा कसा फायदा होणार आहे हे देखील पटवून देण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भग्रंथ-**

[1].गर्गे स.मा.-गोपाळ गणेश आगरकर ,नवी दिल्ली, १९९६
[2].गोखले पु.पा आगरकर चरित्र, पुणे १९४४.
[3].देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, पुणे, १९८३
[4].भोळे- भा.ल. संपा. आजचा सुधारक (आगरकर विशेषांक) नागपूर जून -जुलै १९९५.
[5].खांडेकर-वि. स.संपा. आगरकर व्यक्ती आणि विचार, पुणे,१९४५
[6].फडके-य.दी. शोध बाळगोपाळांचा, पुणे, २००४.